**Hon. Shri R.V.Shivdare and Dr. Minal Gaikwad Plant Donation Program**.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज
• संपादक :
कमलाकर सोनकांबळे
मो.9921988358
www.yashsiddhinews.com, email : yashsiddhinewsgmail.com




# छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बार्टीच्यावतीने शिवदारे कॉलेजमध्ये वृक्षारोपन संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी सोलापूर यांच्या मार्फत शिवदारे कॉलेजमध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वृक्षारोपण आणि व्याख्यान कार्यक्रम आयोजन करण्यात आले होतें.

यावेळ तज्ञ व्याख्याते डॉ.मिनल गायकवाड यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्य सविस्तर स्वरूपात समजावून सांगितले. तसेच व्यसनमुक्ती या विषयावर देखील मार्गदर्शन केले.बहुजन समाज्याच्या सामाजिक उन्नतीसाठी त्या काळात शाहू महाराज यांनी केलेल्या कामाबाबत मार्गदर्शन केले. परिवर्तन ना गती प्राप्त करून दिली.राजा असून ही त्यांनी दिन दलितांना शोषित वर्गाचे दुःख जाणून जवळीक साधली कार्यक्रम सुरवात संविधान वाचन करण्यात आले. नंतर दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे,कॉलेज चे प्राचार्य डॉ.डी.एस.सुत्रावे, बार्टीच्या प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी द. सोलापूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री राजशेखर शिवदारे सर, कॉलेज प्राचार्य डॉ. डी. एस. सूत्रवे सर, समतादूत अस्विनी सुपाते, राजेश्री कांबळे आणि जोती ओवळ उपस्थिती होतें.सूत्रसंचालक डॉ. दामोदर बनसोडे, प्रास्तविक प्रणिता सोनकांबळे बार्टी प्रकल्प अधिकारी , प्रमुख वक्तृया डॉ. मीना गायकवाड मॅडम, आभार प्रदर्शन प्रा.चंद्रशेखर उमरजकर.